


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३१३ वा | शुक्रवार दि ०६ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मुख्यमंत्र्यांकडून मुंबई महानगर प्रदेशासाठी घोषणांचा पाऊस

# रेल्वे, मेट्रो, रस्त्यासह विविध विकासकामांची घोषणा

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज राज्याचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात महाराष्ट्राची राजधानी मुंबईसाठी भरघोस घोषणा करण्यात आल्या. ङ्क्ष२०४७ पर्यंत राज्याची नागरी लोकसंख्या ७० टक्के होणार असून स्थूल राज्य उत्पन्नात या घटकाचे ७५ ते ८० टक्के योगदान असणार आहे. राज्यात शाश्वत शहरी विकास करण्याकरता १० पेक्षा जास्त सक्षम प्राधिकरण स्थापन करणं, ५० पेक्षा अधिक सुनियोजित बहुउपयोगी शहरी समूह विकसित करणं, वाहतूक केंद्रीय विकास तसेच शहरी स्थानिक स्वराज्य सेवा संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजीटलाइज करण्याचं नियोजित आहेङ्क्ष, असं देवेंद्र फडणवीस सुरुवातीला म्हणाले. ङ्क्षमुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १४० अब्ज डॉलरवरुन ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट्य ठेवलं आहेङ्क्ष, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यानंतर मुंबईसाठी काय-काय नवीन विकासकामे केली जातील आणि किती निधी देण्यात येईल, याबाबत मुख्यमंत्री सविस्तर माहिती दिली. वडाळा येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हबसाठी १३० एकर जमीन वाटप करण्यात आली आहे. मुंबई-अहमादाबाद बुलेट ट्रेन मार्गातील ठाणे ते तलासरीमधील ३ स्थानकांचे काम २०२७ अखेर पूर्ण होणार आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाद्वारे निर्माण होणाऱ्या आर्थिक मुल्याचा फायदा घेण्यासाठी विरार, भोईसर आणि ठाणे बुलेट ट्रेन स्थानकाभोवतीच्या क्षेत्राच्या विकासाकरता आराखडा तयार करण्यात येईल. अटल बिहार वाजपेयी शिवडी-नावाशेवा अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्यात येईल. या अंतर्गत करनाळा-चिरनेर, रायगड, पेण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड विकास केंद्र म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे. पालघर जिल्ह्याच्या वाढवण जवळ चौथी मुंबई विकसित करण्याचे नियोजित असून त्या अंतर्गत लॉजिस्टीक आणि विअर हाऊसिंगसाठी विकास केंद्र निर्माण करण्यात येतील. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मुंबई महापानगर प्रदेशातील २० लाख झोपडपट्टीधारकांच्या पुनर्विकासासाठी तसेच भाडेतत्वावरील घरांसह १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे.



मुंबई महानगर प्रदेशात नवीन बेकायदेशीर बांधकाम होणार नाहीत याची खात्री करण्यासाठी जीआयएस आधारित मॅपिंगचा वापर करुन नो न्यू स्लम फ्रेमवर्क विकसित करण्यात येणार आहे. सदर फ्रेमवर्क पुढे इतर शहरांतदेखील लागू करण्यात येईल. केंद्र शासनाकडून नीती आयोगामार्फत देशभरातील निवडक शहरांचा, निवडक क्षेत्रांचा आर्थिक वाढीचा रोडमॅप तयार करण्यात येत आहे. जलवाहतूक : १२५ कि.मी.चे जलमार्ग जाळे ३४० कि.मी.चे करणार, २१ जलमार्गावरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण, ११ नवीन जलमार्गावर २४ नवीन टर्मिनल्स, यासाठी ६६०० कोटी, मुंबईतील रेडिओ क्लब येथील नवीन जेट्टी डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करणार वडाळा, मुंबई येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हब मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची ठाणे ते तलासरी मार्गावरील तीन स्थानके फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणार. विरार, बोईसर, ठाणे स्थानकाभोवती विकासाचा बृहद आराखडा तयार करणार अटलसेतूला जोडून २०० चौरस कि.मी. क्षेत्रात तिसरी मुंबई घडवणार : कर्नाळा, साई, चिरनेर नवनगर आणि नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड शहरे तयार करणार

# बारामतीत रात्रीच्या विमान उड्डाणासाठी यंत्रणा; अजितदादांच्या अपघातानंतर अर्थसंकल्पात घोषणा

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २०२६-२७ साठीचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. फडणवीसांनी अर्थसंकल्पात महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. यावेळी फडणवीस दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विशेष उल्लेख केला. अजित पवार यांची अर्थ खात्यावर असलेली पकड, त्यांनी राज्याला लावलेली आर्थिक शिस्त यांचा उल्लेख करताना फडणवीस यांनी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या. भाषण करताना मन जड झालं आहे. सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपद आणि दीर्घ काळ वित्त मंत्रालयाची धुरा सांभाळलेले राज्याचे लाडके नेते अजितदादा आणि अर्थसंकल्प हे नातं दृढ झालं होतं. त्यांच्या करड्या शिस्तीमुळेच महाराष्ट्राची वित्तीय स्थिती कठीण काळातही स्थिर राहिली. काम करणारा माणूस ही त्यांची ओळख आणि त्यांनी दिलेली विकासाची दिशा आजही आपल्याला प्रेरणा देत आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्याला, आठवणींना उजाळा दिला. अजित पवारांना श्रद्धांजली म्हणून सगळ्या मान्यवरांशी चर्चा करुन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसं भव्य स्मारक उभारण्यात येईल. तसंच त्यांच्या नावानं गतिमान नागरी सेवा पुरस्कार देण्यात येईल, अशा दोन मोठ्या घोषणा त्यांनी केल्या. अजित दादांच्या स्मृतींना हा अर्थसंकल्प समर्पित करत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. लातूर, बारामती इथं रात्रीच्या विमान उड्डाणासाठीची यंत्रणा कार्यरत केली जाईल, अशीही घोषणा फडणवीस यांनी केली. अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अपघात झाला. धावपट्टीपासून ५० मीटर अंतरावर त्यांचं विमान कोसळलं. धावपट्टीवर उतरण्याच्या दुसऱ्या प्रयत्नात विमानाला अपघात झाला. धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्यानं पायलटला लँडिंग करताना अडचणी आल्या होत्या. अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाल्यानंतर बारामतीमधील विमानतळावर असलेल्या गैरसोयी, नाईट लँडिंगची नसलेली सुविधा यांची बरीच चर्चा



झाली. फडणवीस यांनी बारामतीत रात्रीच्या विमान उड्डाणासाठीची यंत्रणा उभारण्याची घोषणा केली आहे. नाईट लँडिंगच्या सुविधा असल्यास धुक्याच्या परिस्थितीत विमान सुरक्षित लँड करता येतं. त्यामुळे संभाव्य अपघात, दुर्घटना टाळता येतात.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रविवार लेख

ते दिवस निराळे असतात. बालभारती पुस्तकाचा न कोरा सुगंध आल्यावर आता वर्षभर हे पुस्तक आपल्याजवळ असणार आहे, याचा होणारा आनंद औरच असतो. पुढे जशा जाणिवा समृद्ध होतात तशी पुस्तके भेटत जातात आणि एक दिवस तर आपलेही पुस्तक असावे अशी इच्छा मनी बळावते. मग पुढील शोध सुरू होतो. आता काय करायचे? अनेकांना प्रकाशक वगैरे भानगडी माहीतच नसतात. फक्त आपले कोरे विचार समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, इतकाच त्यांचा शुद्ध हेतू असतो; परंतु प्रकाशक नावाच्या जमातीशी त्यांची भेट झाल्यावर त्यांना जे कळते त्यामुळे पुस्तक काढायचे तर दूरच, पण ते लिहिणेदेखील विसरून जातात. प्रकाशनाच्या गर्तेत अनेक लेखक वाहून गेले आहेत; अन्यथा महाराष्ट्राला फार आधी सकसता म्हणजे काय याचा परिचय झाला असता. कवी शैलेश चव्हाण. बागलाण तालुक्यातल्या नामपूर परिसरातला. माळरानावरचा कवी. कवितेत प्रचंड दम. कधीही फोन करा, वावरात काम करीत असणार; परंतु कविता खणखणीत, वाजवून घ्यावी अशी. उत्तर महाराष्ट्राला परिचित असलेल्या या कवीच्या नावावर अद्याप पुस्तक नाही. का नाही, असे विचारल्यावर तो सांगतो, प्रकाशनाच्या बारा भानगडी, त्यात कविता अहिराणी! लिहून ठेवायला जमत नाही. एकत्र बाड करायचे म्हणजे कोण करणार? वावरात रोजच काम असते. त्याच्याशिवाय खायचे काय असे नाना प्रश्न. परंतु सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्रकाशनाविषयी मनात असलेली धास्ती. चित्रपटात हिरो महत्त्वाचा असतो. मात्र, सेटवर दिग्दर्शकच बाप असतो, तसेच समाजात कवी हिरो असतो. मात्र, साहित्याच्या जगात प्रकाशकच बाप असतो. एखाद्या चांगल्या लेखकाला चांगला प्रकाशक लाभला नाही तर त्याची माती होते. प्रकाशन व्यवसाय म्हणजे सतीचे वाण वगैरेचा जमाना कधीच गेलाय. आता गल्लाभरू जमात यात शिरली आहे आणि हे सत्य कुणीही नाकारू शकणार नाही. प्रकाशन म्हणजे हल्ली अलीबाबाची गुहा झाली आहे. जो आत शिरला तो बाहेर कसा पडेल हे सांगता येत नाही. त्यामुळे अनेक जण या गुहेत शिरायचे की नाही, असा विचार करून माघारी जातात आणि कसदार साहित्याला समाज मुकतो. कैक वेळा तर लेखकच प्रकाशक बनून आपले स्वत:चे प्रकाशन काढतो आणि पुस्तके महाराष्ट्रभर पोहोचवण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. त्यातून नुकसान आपलेच आहे, याची जाणीव लेखकाला असते; परंतु त्याला गत्यंतर नसते. एक तर प्रसिद्धीचा सोस त्याला गप्प बसू देत नसतो आणि दुसरीकडे प्रकाशक त्याला जी रक्कम सांगतो ती ऐकून तर तो सर्दच होतो. त्यातही पुस्तके राज्यभरात पोहोचविण्याची काहीच गॅरंटी नाही. मी स्वत: अनेक प्रकाशकांच्या घरी, गोडावूनमध्ये पुस्तकांचे अनेक गठ्ठे बांधलेले पाहिलेले आहे, जे वर्षानुवर्षे पडून असतात किंवा कालांतराने रद्दीत जातात. खरे तर पुस्तकांची रद्दी देणे हे एक कसब आहे. कारण त्या लेखकाला याची माहिती कळली तर तो दावा दाखल करू शकतो हे प्रकाशकाला माहीत असते. आजमितीला एखादे पुस्तक प्रकाशन करणे म्हणजे गुलबकावलीचे फूल मिळवण्याइतके अवघड होऊन बसले आहे हे खरे. ते दिवस निराळे असतात. बालभारती पुस्तकाचा नवाकोरा सुगंध आल्यावर आता वर्षभर हे पुस्तक आपल्याजवळ असणार आहे, याचा होणारा आनंद औरच असतो. पुढे जशा जाणिवा समृद्ध होतात तशी पुस्तके भेटत जातात आणि एक दिवस तर आपलेही पुस्तक असावे अशी इच्छा मनी बळावते. मग पुढील शोध सुरू होतो. आता काय करायचे? अनेकांना प्रकाशक वगैरे भानगडी माहीतच नसतात. फक्त आपले कोरे विचार समाजापर्यंत पोहोचले पाहिजे इतकाच त्यांचा शुद्ध हेतू असतो, परंतु प्रकाशक नावाच्या जमातीशी त्यांची भेट झाल्यावर त्यांना जे कळते. त्यामुळे पुस्तक काढायचे तर दूरच, पण ते लिहिणेदेखील विसरून जातात. प्रकाशनाच्या गर्तेत अनेक लेखक वाहून गेले आहेत, अन्यथा महाराष्ट्राला फार आधी सकसता म्हणजे काय, याचा परिचय झाला असता. आपले एखादे पुस्तक असावे असे धनाढ्य माणसाला वाटणे आणि लेखकाला वाटणे यात फरक आहे. चांगली प्रकाशने तर लेखकाला वाऱ्यालादेखील उभे करत नाही. त्यांना राजकारण्यांची, बिल्डर लोकांची अथवा जे पैसे ओतू शकतील, अशांची पुस्तके प्रकाशित करण्यातच जास्त रस असतो. अशी काही उदाहरणे आहेत, परंतु विस्तारभयामुळे ती देत नाही. एक नवा कवी किंवा लेखक त्याचे पुस्तक प्रकाशित करायचे म्हणून प्रकाशकांचे दरवाजे ठोठावतो, परंतु पन्नास हजारांच्या खाली कुणीही बोलायला तयार नसल्याने तो आपली तलवार पुन्हा म्यान करतो. राज शेळकेसारख्या एखाद्या कवीला लोकांचा आश्रय लाभतो आणि उजेड पेरत जातोसारखा काव्यसंग्रह समाजाच्या हाती पडतो, परंतु हे सर्वच कवींच्याबाबत होऊ शकत नाही. ते लोकांनाही परवडणारे नसते आणि प्रकाशकाला तर अजिबातच नाही. त्यामुळे नव्या कवी लेखकांनी जायचे कोठे, असा मोठा प्रश्न उभे राहतो. आजारपण वाढलेले असल्यावर एखाद्या डॉक्टरकडे जावे आणि त्याने महिनाभरानंतरची अपॉइंटमेंट द्यावी, तसे सध्या प्रकाशकाच्या बाबतीत झाले आहे. लेखकाला एखाद्या प्रकाशकाशी बोलायचे असल्यास (पुस्तकाबाबत) महिनाभर वेटिंग असते. (आणि पुस्तक छापण्याला तर आता पाच पाच वर्षे वेटिंग आहे) त्यातही मौज, पॉप्युलर, मॅजेस्टिक, राजहंस, पेंग्विन या प्रकाशनाच्या बाबतीत तर कुणी बोलायलाच नको. नव्या कुणालाही दारात उभे करायचे नाही, असेच त्यांनी ठरवून टाकलेले आहे. राजहंस, नाही रे ते कवितांचे पुस्तक नाही प्रकाशित करीत. का? कवितेचे पुस्तक हे पुस्तक नसते का? की याआधी त्यांनी तशी पुस्तके प्रकाशित केलेलीच नाहीत. केलेली आहेत, बाजारातील उठसूट कुणीही कविता करू लागला आहे, याचा अर्थ त्याच्याआड दडून तुम्ही चांगल्या कवी-लेखकांना नाकारू शकत नाही. पुस्तक प्रकाशित न करण्याला पॅनलवरील चार विचारवंत लेखकांचा दुजोरा घेतला, की तुमचे काम संपले असे होत नाही. हे एका प्रकाशनाच्या बाबतीत नाही तर सगळेच प्रकाशक सध्या याच भूमिकेत आहेत. त्यांना लेखक ही जमातच नको आहे, त्यांना फक्त व्यावसायिकांचे आत्मचरित्र, राजकारण्यांची पुस्तके प्रकाशित करण्यात रस आहे. कारण त्यामागे असलेले आर्थिक गणित.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पहिल्यांदा राज्यसभेत गेले तेव्हा बाळासाहेब हयात होते, सुप्रिया सुळेंकडून बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचा आज राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यात आला. अर्ज दाखल केल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक प्रतिक्रिया दिली. आपण जेव्हा पहिल्यांदा राज्यसभेत गेलो तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी खुल्या मनाने पाठिंबा दिला होता. त्यामुळे ती निवडणूक बिनविरोध झाली होती, अशी आठवण सुप्रिया सुळे यांनी सांगितली. त्याचबरोबर आता शरद पवारांच्या ६ दशकांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीनंतर त्यांना पुन्हा राज्यसभेच्या उमेदवारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे





प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून पाठिंबा मिळाला. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी उद्धव ठाकरे यांचे आभार मानले. २० वर्षांनी असा योगायोग आल्याचं त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षाचेदेखील आभार मानले. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्याला फोन केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.'मी उद्धव ठाकरे यांना भेटायला गेले होते. त्यानंतर मी आज संध्याकाळी साडेसहा वाजता पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी भेटायला जाणार आहे. उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संपूर्ण कुटुंबाला भेटायला जाणार आहे. त्याचबरोबर काँग्रेस पक्ष, काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, के. सी. वेणूगोपाल, मल्लिकार्जुन खर्गे, रमेश चेन्नीथला या सर्व नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानते', अशा भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या.मला मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, तुझ्या वडिलांनंतर केवळ दोन-तीन वर्षच मी राजकारणात उशिरा आलो. पण गेल्या सहा दशकांपासून आम्ही राजकारणात एकत्र आहोत. मला दिग्विजय सिंह यांचादेखील फोन आला. कमलनाथ यांचा फोन आला. ही सर्व ६ दशकांची प्रेमाची नाती आहेत. शरद पवार पुन्हा राज्यसभेत जात असल्याने या सर्वांना आनंद झाला. मी उद्धव ठाकरे यांचे आणि प्रत्येक शिवसैनिकाचे अंतःकरणातून आभार मानते', अशादेखील भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केल्या.योगायोग बघा, मी २००६ मध्ये राज्यसभेत पहिल्यांदा गेले, त्यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे हयात होते. माझी निवडणूकदेखील बिनविरोध झाली होती. त्यानंतर २० वर्षांनी बाळासाहेब आपल्यात नाहीत, पण काँग्रेस पक्ष आणि शिवसेना, आता जे चित्र दिसतंय, महाराष्ट्राच्या सर्वच पक्षांनी सामंजसपणा दाखवलेला दिसतोय, निवडणूक बिनविरोध होईल, असं चित्र आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे सगळेच पक्ष सामंजसपणे आणि सुसंस्कृत महाराष्ट्राचे दर्शन होताना दिसत आहे', असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.माजी दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा जो महाराष्ट्र होता, त्यामध्ये विरोधक हा आपला शत्रू नव्हता, ही आपली वैचारिक लढाई आहे, असा विचार होता. हीच संस्कृती आज आपल्याला या निवडणुकीत दिसत आहे.

## महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नवी नियुक्ती, प.बंगालच्या गव्हर्नरचाही राजीनामा

**मुंबई :** केंद्र सरकारने गुरुवारी रात्री विविध राज्यांच्या राज्यपालांची बदली केली असून, तेलंगणचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निवडणूक होणाऱ्या पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांनी राजीनामा दिला असून, त्यांच्या जागेवर तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी पदाचा राजीनामा दिला होता, त्यानंतर गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राचा अतिरिक्त प्रभार सोपवण्यात आला होता. जवळपास सहा महिन्यांनी महाराष्ट्राला नवे राज्यपाल मिळाले आहेत. राष्ट्रपती भवनाने रात्री निवेदन जारी करून या नियुक्त्या प्रसिद्ध केल्या. बोस यांचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याचे त्यात म्हटले आहे. लडाखचे नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांनीही राजीनामा दिला असून, त्यांची नियुक्ती हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदी करण्यात आली आहे. हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिवप्रताप शुक्ला यांची तेलंगणच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांच्याकडे लडाखचे नायब राज्यपालपद सोपविण्यात आले आहे. तरणजीतसिंग संधू यांची दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाली आहे. लेफ्टनंट जनरल सैद अता हसनैन (निवृत्त) यांची बिहारच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नंदकिशोर यादव यांची नागालँडच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.नियुक्त्या आणि बदल्यांची मालिका ही विविध राज्यपाल आणि उपराज्यपाल पदांमध्ये एक मोठे फेरबदल दर्शवते. देशभरातील संवैधानिक कार्यालयांचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी असे बदल केले जातात. येत्या काही वर्षांत अनेक राज्ये विधानसभा निवडणुकांकडे वाटचाल करत असताना, या नियुक्त्या संवैधानिक देखरेख राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## नितीश कुमारांनी राज्यसभेसाठी अर्ज भरला

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यसभेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी राज्यसभा निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. नितीश कुमार तब्बल २ दशकं मुख्यमंत्री राहिले आहेत. गेल्या डिसेंबरमध्येच त्यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नितीश कुमार यांच्या निर्णयानं त्यांच्या संयुक्त जनता दलाचे कार्यकर्ते दुखावले आहेत. नितीश यांनी राज्यात राहून सरकारचं नेतृत्त्व करावं, अशी त्यांची इच्छा आहे. इच्छेविरुद्ध घटना घडल्यानं कार्यकर्त्यांनी त्यांची नाराजी जाहीरपणे व्यक्त केली.मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय मंत्री अमित शहा उपस्थित होते. नितीश कुमार अर्ज भरणार असल्यानं शहा दिल्लीहून पाटण्याला आले होते. शहांच्या उपस्थितीत नितीश कुमार यांनी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरला. यामुळे राज्यात भाजपचा मुख्यमंत्री बसण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नितीश कुमार यांनी राज्यसभेवर जाण्याचा निर्णय त्यांच्या कार्यकर्त्यांना पटलेला नाही.नितीश कुमार यांच्या निर्णयाविरोधात कार्यकर्ते आक्रमक झाले.

## दोन्ही पक्षांच्या भावना समजून घेणारा नेताच उरला नाही : जयंत पाटील

**मुंबई :** 'विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या आग्रहाने सुरू झाली होती. मात्र, त्यांच्या निधनानंतर ही चर्चा पूर्णपणे थांबली आहे. आता विलीनीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही, कारण दोन्ही बाजूंच्या भावना समजून घेणारा नेताच आपल्यात नाही. त्यामुळे यापुढेही ते होण्याची सूतराम शक्यता नाही', अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते आमदार जयंत पाटील यांनी बुधवारी केली. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.अजित पवार यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची तयारी सुरू होती. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) पक्षातील उमेदवारांनी अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'च्या घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवली होती. मात्र, अजित पवार यांच्या अकाली निधनाने या प्रक्रियेला खीळ बसली. सुनेत्रा पवार यांनी पक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतरही विलीनीकरणाबाबत काहीही भाष्य केले नव्हते. त्यामुळे दोन्ही पक्ष एकत्र येणार की, कसे याविषयी



प्रश्न उपस्थित झाले होते.अखेर याविषयी जयंत पाटील यांनी बुधवारी स्पष्ट भूमिका मांडली. दोन्ही पक्षांतील कार्यकर्ते आणि नेत्यांची भावना समजून घेणारा नेताच राहिला नसल्याने त्या चर्चेचा प्रश्नच उद्भवत नाही. विलीनीकरणाची चर्चा अजित पवार यांच्या आग्रहाने सुरू झाली होती. यापुढेही विलीनीकरणाची सुतराम शक्यता नाही, असे पाटील म्हणाले. दरम्यान, राज्यसभेच्या सातव्या जागेसाठी विरोधी पक्ष महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची उमेदवारी निश्चित झाल्याने राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे आहेत.विधानसभेतील संख्याबळ लक्षात घेता राज्यसभेची एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला येणार होती. त्यामुळे आघाडीत सातव्या जागेवरून गोंधळ होता.

# जनतेचा आणि माझ्या सर्व मित्रपक्षांचा मनापासून ऋणी : शरद पवार

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल करण्यात आला आहे. शरद पवार यांच्या उमेदवारीला महाविकास आघाडीचे घटकपक्ष असलेले काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांनी पाठिंबा दिला आहे. तसेच ही निवडणूक आता बिनविरोध होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे शरद पवार हे पुन्हा राज्यसभेत जाणार असल्याचं निश्चित झालं आहे. शरद पवार गेल्या काही दिवसांपासून आजारी आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तसेच तब्येत बरी झाल्यानंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्जही मिळाला होता. पण त्यांना डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे त्यांनी आज माध्यमांसमोर येवून प्रतिक्रिया न देता ट्विट



करत आपली भूमिका मांडली आहे.१९६७ पासून माझा लोकप्रतिनिधी म्हणून प्रवास सुरू झाला आणि आजपर्यंत तो अखंडपणे सुरू आहे. हा प्रदीर्घ प्रवास केवळ माझा नसून महाराष्ट्राच्या जनतेचा आहे, कारण त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा संसदीय प्रवास कधीही खंड न पडता पुढे सुरू ठेवणे मला शक्य झाले', असं शरद पवार म्हणाले.'१९६७ मध्ये प्रथम महाराष्ट्रात विधानसभेवर निवडून जाण्याची संधी मिळाली. सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात सातत्याने काम करत असताना लोकांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर राज्यात मंत्री, मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली.

तसेच केंद्रात संरक्षणमंत्री आणि दहा वर्षे कृषीमंत्री म्हणून काम करण्याची जबाबदारीही मला मिळाली. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना महाराष्ट्रासाठी तसेच देशासाठी सकारात्मक काम करता आले, यामागे जनतेचा विश्वास हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ राहिले आहे', असंही शरद पवार म्हणाले.महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा पुढील सहा वर्षे सेवा करण्याची संधी देऊन माझ्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेचा तसेच माझ्या सर्व मित्रपक्षांचा मनापासून ऋणी आहे', अशी भावना शरद पवार यांनी व्यक्त केली.

'महाराष्ट्राने मला दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठबळ हेच माझ्या आयुष्याच्या ऊर्जेचे खरे स्रोत आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी काम करण्याची संधी आयुष्यभर मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. पुढील काळातही जनतेच्या अपेक्षांना न्याय देत ही सेवा प्रामाणिकपणे करत राहण्याचा माझा प्रयत्न असेल', अशी ग्वाही शरद पवारांनी दिली.

# सोनालीच्या लग्नानंतरही भेटायचा; नवऱ्यानं ट्रॅप लावला, होळीला आलेल्या सागरची पती-पत्नीनं मिळून हत्या केली

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा परिसरात गुरुवारी सकाळी दिवसाढवळ्या घडलेल्या एका खळबळजनक हत्येच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खापरखेडा-कोराडी रोडवर पती-पत्नीने मिळून एका तरुणावर धारदार चाकूने अनेक वार करून त्याची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाची ओळख सागर वानखेडे (रा. सावंगी, ता. नरखेड, जि. नागपूर) अशी झाली आहे. सागर हा पुण्यात नोकरी करत असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राजू गजभिये आणि त्याची पत्नी सोनाली गजभिये (रा. वार्ड क्रमांक २, खापरखेडा) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सोनाली गजभिये आणि सागर वानखेडे यांच्यात शिक्षण घेत असताना प्रेमसंबंध होते. मात्र पुढे सोनालीचे लग्न



राजू गजभिये याच्यासोबत झाले. लग्नानंतरही सोनाली आणि सागर यांच्यात संपर्क कायम असल्याचे समजते. या कारणावरून राजू गजभियेने यापूर्वी खापरखेडा पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली होती.दरम्यान, होळीच्या सणानिमित्त सागर पुण्यावरून आपल्या सावंगी गावात आला होता. त्यावेळी त्याने इंस्टाग्रामच्या माध्यमातून सोनालीला मेसेज पाठवून भेटण्यासाठी बोलावले. गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास सागर खापरखेडा येथे पोहोचला. श्याम मंगल कार्यालयाजवळ सोनाली त्याच्या दुचाकीवर बसली आणि दोघेही तेथून निघाले.यावेळी सोनाली आपल्या सोबत एक चाकू घेऊन गेल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे राजू गजभियेने मुलांना शाळेत सोडल्यानंतर दोघांचा पाठलाग सुरू केला.

खापरखेडा-कोराडी मार्गावर कोलार नदीचा पूल ओलांडल्यानंतर सोनालीने मुद्दाम आपली पर्स खाली पाडली. सागरने दुचाकी थांबवून पर्स उचलण्यासाठी खाली वाकताच सोनालीने चाकू काढून त्याच्यावर दोन वार केले. त्याच वेळी घटनास्थळी पोहोचलेल्या राजू गजभियेनेही सागरवर चाकूने अनेक वार केले. या हल्लयात सागर गंभीर जखमी झाला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर दोन्ही आरोपी आपल्या घरी परतले. त्यानंतर ते पोलिस ठाण्यात जात असताना पोलिसांच्या डीबी पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

## प्रेमप्रकरणातील वादातून तुरुंगात, बाहेर येताच ओंकारवर गोळीबार

**कोल्हापूर :** वस्त्रनगरी इचलकरंजीत भररस्त्यात आणि पोलिसांच्या उपस्थितीत झालेल्या गोळीबाराने खळबळ उडाली आहे. नाजूक प्रकरणातील जुना वाद शांत झाल्यासारखा दिसत असताना बुधवारी रात्री ८ वाजता इचलकरंजी-सांगली रस्त्यावर शिक्षक पतसंस्थेजवळ ओंकार जितेंद्र कांबळे (वय २२, रा. समता चौक, सांगलीवाडी) याच्यावर दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी गोळी झाडली. यानंतर तात्काळ पोलिसांनी कारवाई करत संशयित अनुराग अमोल सूर्यवंशी (वय २०, रा. शिकलगार हाऊस, पुजारी मळा, इचलकरंजी) आणि ओमकार संजय शेंडे (वय २०, रा. यशवंत कॉलनी, हातकणंगले) यांना रात्रीच ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.जयसिंगपूर पोलिस ठाण्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये एका प्रेम प्रकरणातून अपहरण आणि हल्लयाच्या गुन्ह्यात ओंकार कांबळे आणि त्याच्या १० ते १२ साथीदारांवर कारवाई झाली होती. जामीन मिळाल्यानंतर बुधवारी प्रतिबंधात्मक कारवाईसाठी त्याला इचलकरंजी अपर पोलिस अधीक्षक कार्यालयात आणले गेले होते. येथे हल्लेखोरांची पाळत असल्याचा संशय



ओंकारला आल्याने पोलिसांना माहिती दिली. कारवाईनंतर कॉन्स्टेबल जगदीश पाटील यांच्यासोबत दुचाकीवर निघताना सांगली रोडवरील पशुखाद्य दुकानासमोर मागून दुचाकीवर आलेल्या दोघांनी जवळून गोळी झाडली.

गोळी ओंकारच्या बरगडी आणि पोटात घुसल्याने तो गंभीर जखमी झाला.हल्लेखोरांनी सांगली दिशेने दुचाकीवर पळ काढला. परिसरातील नागरिकांनी घाबरून दुकाने बंद केली. त्यानंतर ओंकारला कोल्हापूर खासगी रुग्णालयात दाखल केले असून त्याची स्थिती चिंताजनक आहे.दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली असून पोलिस अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी आणखी साथीदारांचा शोध सुरू ठेवला असून शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

## वहिनीवर अत्याचार, दिराला १० वर्ष सक्तमजुरी

**पुणे :** वहिनीला चहा करायला सांगून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या ४३ वर्षांच्या चुलत दीराला दहा वर्षे सक्तमजुरी आणि २० हजार रुपये दंडाची शिक्षा बारामती अतिरिक्त सत्र न्यायालयाने ठोठावली. आरोपीविरोधात पीडितेने नोंदविलेली साक्ष विश्वासार्ह व ठोस असून, तिला पती आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष व न्यायवैद्यक तपासणी अहवालाने दुजोरा दिला आहे. त्यामुळे केवळ पीडितेच्या विश्वासार्ह साक्षीच्या आधारेही आरोपीला दोषी ठरविता येऊ शकते, या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याचा दाखला देऊन अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. डी. शेळके यांनी हा निकाल दिला.पीडितेने या प्रकरणी बारामती शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार, आरोपीविरोधात भारतीय दंड संहितेनुसार अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. नात्याला काळिमा फासणारी ही घटना १४ जून २०२४ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास बारामती येथील प्रगतीनगर परिसरात पीडितेच्या घरात घडली.पीडितेचे पती सुरक्षारक्षक आहेत, तर आरोपी कामगार आहे. घटनेच्या दिवशी दुपारी दीड वाजता आरोपी पीडितेच्या घरी आला. कामावर गेले असताना अत्याचा केले.

## गाडी हळू चालवा' म्हटल्याचा राग ; टिटवाळ्यात टोळीचा घरावर हल्ला

**टिटवाळा :** टिटवाळ्यात गाडी हळू चालव म्हणताच तुफान राडा झाला आहे. पाच ते सहा जणांच्या टोळीने घरावर हल्ला करत संपूर्ण कुटुंबाला लोखंडी हत्याराने बेदम मारहाण केली. टोळीची दहशत पाहता कुटुंबाने स्वतःला तब्बल अर्धा तास घरात कोंडून घेतले होते. या प्रकाराची संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या मारहाणीत तीन जण जखमी झाले असून टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून परिसरात भीतीचे वातावरण आहे.टिटवाळा परिसरात किरकोळ कारणावरून मोठा राडा झाल्याची घटना समोर आली आहे. गाडी हळू चालवा असे सांगितल्याचा राग आल्याने पाच ते सहा जणांच्या टोळीने एका कुटुंबावर हल्ला करत घराची तोडफफोड केली आणि बेदम मारहाण केली. या हल्लयात तीन जण जखमी झाले असून संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या प्रकरणी कल्याण ग्रामीण टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार,



टिटवाळा आंबेकर चौक परिसरातील आर. के. चाळ, राजेश्वरी बिल्डिंगजवळ ही घटना घडली. ५० वर्षीय तक्रारदार झुल्फेकर अली अब्दुल्ला खान हे आपल्या भावांसह फॅब्रिकेशनचे काम करतात. ३ मार्च रोजी ते आपल्या भावांसह घराबाहेर उभे असताना एक तरुण मोटारसायकल वेगात चालवत परिसरातून जात होता. त्यावेळी त्यांनी त्याला येथून गाडी हळू चालवा असे सांगितल्याने वाद निर्माण झाला.यानंतर संबंधित तरुण काही वेळातच आपल्या वडिलांसह आणि इतर साथीदारांना घेऊन घटनास्थळी परतला. त्यांनी शिवीगाळ करत लोखंडी वस्तूने घराची तोडफफोड केली आणि तक्रारदाराच्या डोक्यावर मारहाण केली. तसेच तोंडावर मार लागल्याने दोन दात पडल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# हॉस्टेलमध्ये दहावीच्या सात मुलांचा लहानग्यांवर अनैसर्गिक अत्याचार

**नाशिक :** इगतपुरी येथील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील काही अल्पवयीन मुलांना याच वसतिगृहातील दहावीत शिक्षण घेणाऱ्या सात मुलांनी गुंगीचे औषध देऊन त्यांच्यावर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. या घटनेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी वसतिगृह अधीक्षकासह सात विधिसंघर्षित मुलांविरोधात बालकांवर लैंगिक अत्याचार कायद्याअंतर्गत आणि रॅगिंगप्रकरणी इगतपुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. मुलांच्या सुरक्षिततेबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही, अशा शब्दात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आश्वस्त केलं आहे.दहावीत शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहातील सात विधिसंघर्षित मुलांनी वसतिगृहातीलच पाचवी ते आठवीच्या वर्गातील मुलांना गुंगीचे औषध देऊन वसतिगृह आवारात त्यांच्याशी वेळोवेळी अनैसर्गिक अत्याचार केला. गेल्या सात महिन्यांपासून हा प्रकार



सुरू होता. वरिष्ठ वर्गातील मुलांच्या भीतीपोटी पीडित मुलांनी या प्रकाराची वाच्यता केली नाही.वैद्यकीय अधीक्षक सुशांत रमेश दूधसागरे यांना पीडित मुलांनी माहिती दिली होती. मात्र, त्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला.

या घृणास्पद प्रकाराने इगतपुरी तालुक्यात खळबळ उडाली आहे. इगतपुरी पोलिस निरीक्षक सारिका आहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक के. पी. भोजने तपास करीत आहेत.दरम्यान, वसतिगृहात मुलांवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची माहिती मि ळताच जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाचे प्रभारी अधिकारी डॉ. संजय शिंदे आणि अधीक्षक मदन बडे यांच्यासह सहयोगी कर्मचाऱ्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळास आणि स्थानिक पोलिस स्टेशनला भेट दिली.

त्यांनी प्रकरणाची प्राथमिक चौकशीची प्रक्रिया पूर्ण करून जिल्हा परिषदेच्या सीईओंना माहिती सादर केली आहे.या प्रकरणाच्या तपासासाठी आता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात येणार आहे. 'प्रशासन हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेत असून, मुलांच्या सुरक्षिततेबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही,' असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# इंग्लंडला नमवत टीम इंडिया फायनलमध्ये

## जेतेपदासाठी आता न्यूझीलंडशी लढत, सॅमसन सामनावीर, बेथेलचे शतक वाया





### संक्षिप्त धावफलक

- **भारत २० षटकांत ७ बाद २५३ :** (संजू सॅमसन ४२ चेंडूत ८९, ईशान किशन १८ चेंडूत ३९, शिवम दुबे २५ चेंडूत ४३, हार्दिक पांड्या २७, तिलक वर्मा २१, विल जॅक्स आणि आदिल रशीद प्रत्येकी २ बळी, जोफ्रा आर्चर १ बळी)
- **इंग्लंड** २० षटकांत ७ बाद २४६ (फिल सॉल्ट ५, जोस बटलर २५, हॅरी ब्रूक ७, टॉम बँटन १७, विल जॅक्स ३५, सॅम करन १८, जेकब बेथेल ४८ चेंडूत ८ चौकार आणि ७ षटकारासह १०५, आर्चर ४ चेंडूत नाबाद १९, हार्दिक पांड्या २ बळी, अर्शदीप, बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल प्रत्येकी १ बळी).

### भारतीय संघ सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये

- टीम इंडियाने सलग दुसऱ्यांदा आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत भारतीय संघाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना फायनलमध्ये प्रवेश केला होता. त्यावेळी फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेला नमवून जेतेपदाचा मान पटकावला होता. यावेळी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारताने फायनलमध्ये प्रवेश केला आहे. यावेळी भारतीय संघाचा सामना न्यूझीलंडविरूद्ध होणार आहे.

**मुंबई/वृत्तसंस्था :** वानखेडेच्या ऐतिहासिक मैदानावर टीम इंडियाने पुन्हा एकदा विजयाचा झेंडा फडकवला आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या दुसऱ्या उपांत्य लढतीत भारताने बलाढ्या इंग्लंडचा ७ धावांनी धुव्वा उडवत दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला. संजू सॅमसन, ईशान किशन आणि शिवम दुबे यांच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर भारताने २५३ धावांचा डोंगर उभा केला होता, ज्यासमोर इंग्लंडकडून जेकब बेथेल हा शेवटपर्यंत एकटा नडला. इंग्लंडचा संघ २४६ धावांत गारद झाला. आता टी-२० विश्वचषकचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील इंग्लंडविरुद्ध उपांत्य फेरीत नाणेफेक गमावल्यावर भारतीय संघाने धमाकेदार फलंदाजी केली. अभिषेक शर्माच्या रुपात भारतीय संघाने धावफलकावर २० धावा असतानाच पहिली विकेट गमावली.

पण संजू सॅमसनने ईशान किशनच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी ४५ चेंडूत ९७ धावांची दमदार भागीदारी साकारली. ईशान किशनने १८ चेंडूत २१६ च्या स्ट्राईक रेटसह ३९ धावांची खेळी केली. ईशान माघारी फिरल्यावर टीम इंडियाने शिवम दुबेला चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवले.

हा प्रयोग यशस्वी ठरला. संजूसोबत त्याने तिसऱ्या विकेटसाठी २२ चेंडूत ४३ धावांची भागीदारी रचली. संजूचे शतक अवघ्या ११ धावांनी हुकले. पण ४२ चेंडूत ८ चौकार आणि ७ षटकारासह ८९ धावा करत त्याने संघाकडून सर्वोच्च धावसंख्या साकारली. यानंतर शिवम दुबेने धावबाद होऊन परतण्याआधी २५ चेंडूत ४३ धावा फटकावल्या. अखेरच्या षटकात तिलक वर्मासह हार्दिक पांड्याचा जलवा पाहायला मिळाला. तिलकने फक्त ७ चेंडूत २१ धावा कुटल्या तर हार्दिक पांड्याने १२ चेंडूत २७ धावांची खेळी करत टीम इंडियाला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत दुसऱ्यांदा २५० धावांचा आकडा पार करुन दिला. या जोरावर भारतीय संघाने २० षटकांत ७ बाद २५३ धावांचा डोंगर उभा केला.

२५४ लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात पण धक्कादायक झाली. हार्दिक पांड्याने दुसऱ्या षटकांच्या पहिल्याच चेंडूवर भारताला पहिले यश मिळवून दिले, त्याने फिल साल्टला आऊट केले. तो फक्त पाच धावा करू शकला. त्यानंतर हॅरी ब्रूकही मोठी खेळी करू शकला नाही, तो ७ धावा करून जसप्रीत बुमराहच्या चेंडूवर अक्षर पटेलकडे झेल देत माघारी परतला. जोस बटलर मात्र चांगल्या लयीत दिसत होता, पण त्याची खेळीही फार काळ टिकली नाही. २५ धावांवर असताना फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने त्याला बोल्ड केले. मात्र जेकब बेथेल एकटा नडला, त्याने आधी अवघ्या १९ चेंडूमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने ४५ चेंडूत शतक ठोकले, पण तो संघाला विजय मिळून देऊ शकला नाही. जेकबने ४८ चेंडूत १०५ धावांची खेळी साकारली. यानंतर आर्चरने शेवटच्या षटकात तीन षटकार खेचले खरे पण तोपर्यंत उशीर झाला होता. इंग्लिश संघाला ७ बाद २४६ धावापर्यंतच मजल मारता आली.

आयसीसी टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या उपांत्य लढतीत संजूने इंग्लंडच्या गोलंदाजांना भरपूर चोप देताना ८९ धावांची अविश्वसनीय खेळी केली. या खेळीत त्याने ८ चौकार आणि ७ षटकार खेचले. दरम्यान, वर्ल्ड कपच्या बाद फेरीत ५० हून अधिक धावांची खेळी करणारा संजू भारताचा चौथा सलामीवीर ठरला. याआधी गौतम गंभीर, रोहित शर्मा, विराट कोहली यांनी हा पराक्रम केला होता.

याशिवाय, टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील एकाच हंगामात सर्वाधिक षटकार मारण्याचा रेकॉर्ड हा रोहित शर्माच्या नावावर होता. रोहित शर्माने याआधी एकाच टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत १५ षटकार खेचले होते. आता संजू सॅमसनने ४ सामन्यांमध्ये त्याने सर्वाधिक षटकार खेचण्याचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. संजू सॅमसनने आतापर्यंत १६ षटकार खेचले आहेत.

## गुकेशचा विजयाचा शोध चालूच, मगसुदलूविरुद्ध बरोबरी

**प्राग/वृत्तसंस्था :** प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवाच्या मास्टर्स विभागाच्या सातव्या फेरीत इराणच्या परहम मगसुदलूने डी. गुकेशला बरोबरीत रोखले. त्यामुळे विश्वविजेत्या गुकेशचा विजयासाठीचा प्रयत्न सुरूच राहिला. फक्त दोन फेऱ्या शिल्लक असताना गुकेश दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे. गुकेशच्या चार बरोबरी तीन वेदनादायक पराभवांसह आल्या आहेत आणि सर्वांत तऊण विश्वविजेत्यासाठी त्याच्या खेळात काही सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्याची वेळ आलेली आहे. दरम्यान, या स्पर्धेतील दुसरा भारतीय गतविजेता अरविंद चिदंबरम उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबबोएव्हशी बरोबरी साधून सात सामन्यांनंतर पन्नास टक्के गुणांवर आहे.

दिवसाचा एकमेव विजेता जर्मनीचा विन्सेंट कीमर ठरला, ज्याने स्पेनच्या डेव्हिड आंतोन गुइजारोला पराभूत केले. डचमन जॉर्डन व्हॅन फॉरेस्ट त्याचे जवळचे प्रतिस्पर्धी झेक प्रजासत्ताकचा डेव्हिड नवारा आणि उझबेकिस्तानचा नोडिरबेक अब्दुसत्तोरोव्ह यांच्यापेक्षा अर्ध्या गुणाने पुढे आहे. गुकेशने बर्लिन बचावाचा वापर केला आणि मगसुदलूविरुद्ध काळ्या



रंगाच्या सोंगाट्या घेऊन खेळताना एक मजबूत स्थान मिळवले. इराणी खेळाडू बराच काळ आपली स्थिती अबाधित ठेवण्यात यश आल्याबद्दल आनंदित होता. ४९ चालींनंतर हा सामना अनिर्णित राहिला. दुसरीकडे, चॅलेंजर्स विभागात ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने आणखी एक चांगला निकाल दिला. तिने डेन्मार्कच्या जोनास बुहल बजेरेला बरोबरीत रोखले, तर ग्रँडमास्टर सूर्यशेखर गांगुलीने अखेर चीनच्या जिनेर झूला हरवून पहिला विजय मिळवला.

## ऑस्ट्रियन महिला हॉकी संघ हैदराबादमध्ये दाखल

**हैदराबाद :** आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या येथे होणाऱ्या २०२६ च्या विश्वचषक हॉकी पात्रता स्पर्धेसाठी ऑस्ट्रियन महिला हॉकी संघाचे येथे आगमन झाले. या पात्र फेरीच्या स्पर्धेत आठ संघांचा समावेश आहे. या वर्षीच्या ऑगस्टमध्ये बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त यजमानपदाने होणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या महिलांच्या विश्वचषक स्पर्धेसाठी या पात्रतेच्या स्पर्धेतून तीन संघांना स्थान मिळू शकेल. ऑस्ट्रिया महिला हॉकी संघाचे सामने इंग्लंड, इटली, कोरिया यांच्याबरोबर होणार आहेत. हे सर्व संघ अ गटात आहेत. या पात्रतेच्या स्पर्धेसाठी भारतीय महिला हॉकी संघाचे हैदराबादमध्ये दोन दिवसांपूर्वी आगमन झाले तसेच स्कॉटलंडचा संघ मंगळवारी हैदराबादमध्ये दाखल झाला. या पात्र फेरी स्पर्धेतील सर्व सामन्यांचे थेट प्रेक्षपण स्टारस्पोर्ट्स खेल आणि जीओ हॉटस्टार वाहिनीवरून केले जाणार आहे.



## सचिनच्या लेकाचं झालं लग्न, अर्जुन-सानियानं घेतले फेरे



**मुंबई/वृत्तसंस्था :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या घरी सनई-चौघडे वाजले आहे. सचिनचा मुलगा अर्जुन तेंडुलकरचा विवाह सोहळा गुरुवारी संपन्न झाला आहे. आज सकाळपासूनच अर्जुन तेंडुलकरच्या लग्नाच्या विधींनाही सुरुवात झाली होती. लग्नापूर्वी त्याचा मेहंदी समारंभ मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्समध्ये पार पडला. ज्यामध्ये क्रिकेट आणि राजकारणातील अनेक प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या.

टीम इंडियाचा माजी दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकर याचा मुलगा अर्जुनच्या लग्नसोहळ्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. अखेर गुरुवारी, ५ मार्च रोजी अर्जुन आणि सानिया यांचा विवाह सोहळा मुंबईत पार पडला आहे. दरम्यान, या सोहळ्याचा व्हिडिओ समोर आला असून तो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. दरम्यान लग्नाचा हा कार्यक्रम एका खासजी ठेवण्यात आला होता. त्यामध्ये फक्त कुटुंब आणि जवळच्या मित्रांना आमंत्रित करण्यात आलं होतं. मेहंदी समारंभाला रवी शास्त्री, युवराज सिंग, हरभजन सिंग, झहीर खान, इरफान पठाण, युसूफ पठाण आणि अजित आगरकर यांच्यासह अनेक क्रिकेट दिग्गजांनी उपस्थिती लावली होती.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'इराणच्या शाळांमध्ये अमेरिकेच्या विध्वंसाच्या घोषणा देण्यास शिकवतात'





**मुंबई :** इराणमधील परिस्थिती सध्या भयानक आहे. अमेरिका आणि इस्रायल इराणवर हल्ला करत आहेत. दरम्यान,माध्यमांसोबत बोलताना इराणी अभिनेत्री एलनाज नौरोजी म्हणाली की, इराणी शाळांमध्ये मुलांना पहिल्यांदा अमेरिकेचा विनाश कसा करायचा याबद्दल शिकवलं जातं आणि नंतर त्यांचा अभ्यास सुरू होतो.आयएएनएस वृत्तसंस्थेशी बोलताना एलनाज नौरोजीनं सांगितलं की, इराणमध्ये महिलांसाठी कोणत्याही संधी नाहीत. अभिनेत्री म्हणाली, 'तिथल्या स्त्रिया आता करतायत ते पहा आणि मी काय करतेय ते बघा. कारण मला जर्मनीमध्ये आणि इथे भारतात संधी आहेत... एक लोकशाही देश ज्यानं मला इथे राहण्याची परवानगी दिली, आणि तेही स्वतःच्या देशात असल्याप्रमाणे. त्यासाठी मी कायम ऋणी आहे. एलनाज नौरोजी पुढे म्हणाली की, 'मला हे माहित आहे, कारण मी इराणमध्ये होते. तिथे काय वातावरण असू शकतं हे मला चांगलंच माहितीये आणि माझ्याकडे जे आहे ते खूप मौल्यवान आहे. कारण, मी एका दमनकारी राजवटीत जगलेय, माझा जन्म एका दमनकारी राजवटीत झाला. मी अशा शाळांमध्ये शिकलेय जिथे तुम्हाला सर्वप्रथम अमेरिकेच्या विध्वंसाच्या घोषणा देण्यास शिकवतात आणि नंतर अभ्यास शिकवतात.'दरम्यान, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी गुरुवारी अमेरिका, इस्रायल आणि इराणला तणाव कमी करण्याचं आवाहन केलं. दोन्ही नेत्यांनी इराणनं कधीही अण्वस्त्रे मिळवू नयेत, असंही म्हटलं. ऑस्ट्रेलियाच्या राजधानीत झालेल्या बैठकीनंतर, कॅनडाचे पंतप्रधान कार्नी यांनी अल्बानीजसोबत पत्रकार परिषदेत बोलताना म्हटलं की, 'आम्हाला युद्ध आणि तणाव कमी झालेला हवाय. युद्धात सहभागी असलेल्या देशांव्यतिरिक्त इतर देशांनी शांततेसाठी एकत्र काम करावं.' अल्बानीज पुढे म्हणाले की, जगाला वाद कमी होताना पहायचं आहे आणि इराणनं आपल्या हल्ल्याच्या ठिकाणांचा विस्तार थांबवावा. त्यांनी सांगितलं की, आखाती देश यात सहभागी नाहीत, परंतु त्यांच्यावर हल्ले केले जातायत, ज्यामध्ये पर्यटन क्षेत्रांचाही समावेश आहे.

# मुलगा विहान पहिलीच होळी, विकी कौशलनं केलं कतरिनाचं कौतुक





**मुंबई :** अभिनेता विकी कौशल लवकरच संजय लीला भन्साळीयांच्या 'लव्ह अँड वॉर' या सिनेमात दिसणार आहे. या सिनेमातल्या त्याच्या भूमिकेसह वैयक्तिक आयुष्यात तो निभावत असलेली 'बाबा' ही भूमिका अधिक आव्हानात्मक असल्याचं त्याला वाटतं.पत्नी कतरिनासोबत त्यानं मुलगा विहान याच्या जन्मानंतरचा पहिला होळीचा सण नुकताच साजरा केला. यावेळी त्यानं विहानच्या बाबापेक्षा आईच भारी असल्याबद्दल भाष्य केलं.विकी म्हणतो, 'विहानच्या जन्मानंतरची पहिली होळी साजरी करण्याचा अनुभव खूप खास होता.

मला आजही आठवतं, लग्नानंतर प्रत्येक सण कुटुंबासोबत साजरा करण्यासाठी कतरिना नेहमीच आग्रही होती आणि आजही ती प्रत्येक गोष्टीत पुढे असते. तिनं ज्या पद्धतीनं आई म्हणून स्वतःचं वेळापत्रक आखलं आहे, ते पाहून मला तिचं कौतुक वाटतं. तिनं स्वतःला आईच्या भूमिकेत पूर्णपणे झोकून दिलं आहे. बाबा ही माझी भूमिका सर्वांत आव्हानात्मक असली, तरी इथे बाबापेक्षा त्याची आईच भारी आहे, असं मी म्हणेन.'तसंच विकीनं सांगितलं की, विहानच्या जन्मानंतर त्याला एका अशा गोष्टीची भीती वाटतेय की, ज्याचा त्यानं पूर्वी कधीच विचार केला नव्हता. विकीच्या मते, वडील झाल्यानंतर वेळ किती वेगानं जातो आणि ती मौल्यवान असतो, याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली आहे. पूर्वी मी कोणत्याही गोष्टीची इतकी काळजी करत नव्हतो, पण आता माझ्या मुलाच्या आठवणी हरवतील की काय, अशी भीती मला सतत सतावतेय, असंही त्यानं एका मुलाखतीत म्हटलं.



# दुबईत अडकलेल्या स्मिता गोंदकरची शिंदेंनी केली मदत



**मुंबई :** इराणने कुवेत, बहारिन, संयुक्त अरब अमिराती इथल्या अमेरिकी तळांवर हल्ले केले. अनेक विमान कंपन्यांनी पश्चिम आशियातील त्यांची विमानसेवा स्थगित केली आहे, तर काही उड्डाणे रद्द केली आहेत. त्यामुळे परदेशात अडकलेल्या भारतीयांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतोय. त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी भारत सरकारकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अशातच मराठी अभिनेत्री स्मिता गोंदकर हिने तिचा दुबईतील अत्यंत भीतीदायक अनुभव सांगितला आहे. स्मिता तिच्या कुटुंबीयांसोबत दुबईत अडकली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिला आणि तिच्या कुटुंबीयांना भारतात परत आणण्यासाठी मदत केली आहे. याबद्दलची एक पोस्ट तिने इन्स्टाग्राम वर लिहिली आहे.'गेले काही दिवस माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होते. स्फोटकांचे मोठे आवाज, त्यामुळे हादरणाऱ्या खिडक्या, रात्रीच्या वेळी आकाशात उडणारे क्षेपणास्त्रे, इंटरसेप्शन्स, मातीचे ढिगारे, दिवसाही आकाशात लहान ढगांसारखी एखादी रचना दिसणं.. ही परिस्थिती निवळेल आणि आम्ही लवकरच घरी परतू अशी आम्हाला आशा होती. परंतु हवाई क्षेत्र बंद असल्याने, वारंवार बुकिंग आणि चेक-इन करूनही दररोज विमान उड्डाणं रद्द होत असल्याने आणि माझ्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक माझ्यासोबत प्रवास करत असल्याने घरी परतणं जवळपास अशक्य वाटू लागलं', अशा शब्दांत ती व्यक्त झाली.याविषयी तिने पुढे लिहिलं, 'मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंगेश देसाई आणि अतिरिक्त आयुक्त राहुल जेठे यांचे मनापासून आभार मानू इच्छिते. त्यांनी त्वरित हस्तक्षेप करून सातत्याने मदत केल्याबद्दल धन्यवाद. आमच्या राहण्याची, पिकअपची व्यवस्था करण्यापासून ते भारतात सुरक्षित परतण्यापर्यंत त्यांनी केलेले प्रयत्न खरोखरच आश्वासक होते. तुमच्या जलद कृती आणि पाठिंब्यामुळे फक्त माझ्या कुटुंबालाच नाही तर अडकलेल्या इतर अनेक भारतीयांना सुरक्षितपणे घरी परतता आलं. अशा गंभीर परिस्थितीत तुमचा त्वरित प्रतिसाद आणि वचनबद्धता हे मजबूत नेतृत्व आणि नागरिकांबद्दलची खरी काळजी दर्शवते. याआधी कुवैतमध्ये अडकलेल्या अभिनेत्री विशाखा सुभेदारच्या मुलाचीही एकनाथ शिंदेंनी मदत केली होती.

# तो बळीचा बकरा बनतो.. ; अर्जुन कपूरबद्दल जान्हवी स्पष्टच म्हणाली



**मुंबई :** सोशल मीडियावर कधी कोण कोणत्या कारणासाठी ट्रोल होईल, याचा आजकाल काही नेम नाही. यामध्ये सेलिब्रिटींना सर्वाधिक लक्ष्य केलं जातं. बॉलिवूड, मराठी किंवा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी असो.. कलाविश्वात असे काही सेलिब्रिटी आहेत, ज्यांनी काहीही केलं, काहीही म्हटलं तरी ते कायम ट्रोलर्सच्या निशाण्यावर असतात. असंच एक नाव म्हणजे अर्जुन कपूर. अर्जुन कपूरला अनेकदा त्याच्या फ्लॉप करिअरमुळे आणि खासगी आयुष्यामुळे ट्रोल केलं जातं. सोशल मीडियावर त्याच्या नावाने असंख्य मीम्स आणि मीम पेजेस पहायला मिळतात. आता अर्जुन कपूरची सावत्र बहीण आणि अभिनेत्री जान्हवी कपूरने अशा ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. तुम्हाला उगाच बळीचा बकरा बनवला जातो, असं ती म्हणाली आहे.'ग्रेझिया'ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवी म्हणाली, ङ्मी जितकं सोशल मीडिया कल्चरला (संस्कृती अथवा ट्रेंड) समजून घेतलं, त्यानुसार मला असं वाटतं की प्रत्येकाला व्ह्यूज हवे असतात, व्हायरल व्हायचं असतं, स्वतःचं अस्तित्व टिकवून ठेवायचं असतं. त्यामुळे जर ते तुमच्याबद्दल कंटेंट बनवत असतील तर तुम्ही फक्त बळीचा बकरा आहात. ते तुमच्या नावाचा वापर क्लिकबेट आणि अशा गोष्टींसाठी करत आहेत, ज्याने त्यांना फक्त एंगेजमेंट मिळेल. पण जेव्हा तुम्हाला चुकीचं समजलं जातं आणि हे सर्व शोषण, बुलिंग अशा गोष्टींमध्ये बदलतं, तेव्हा वाईट वाटतं, दुःख होतं. हे सर्व मी माझ्या भावासोबत घडताना पाहिलं आहे. अशा पद्धतीच्या वागणुकीसाठी कोणतंही निमित्त नसतं. नकारात्मकता फक्त नकारात्मकतेला वाढवते आणि तुम्हाला स्वतःला त्यापासून दूर राहावं लागतं.ङ्गेल्या काही काळापासून अर्जुन कपूरच्या सोशल मीडियावर सातत्याने नकारात्मक कमेंट्स पहायला मिळत होते. त्याला बरंच ट्रोल केलं जात होतं. गेल्या महिन्यात आईच्या जन्मदिनानिमित्त अर्जुनने सोशल मीडियावर भावूक पोस्ट लिहिली होती. गेल्या काही काळापासून आयुष्य फार निर्दयी असल्याचं त्याने त्यात म्हटलं होतं. यानंतर अर्जुनच्या सोशल मीडियावर नकारात्मक कमेंट्स काही प्रमाणात कमी झाले. सतत फ्लॉप होणारे चित्रपट, मलायकासोबतचं रिलेशनशिप आणि ब्रेकअप या सर्व कारणांमुळे अर्जुनला सतत ट्रोल केलं जात होतं.

# हिवरखेड पूर्णा वाळू डेपोतून ऑनलाईन वाळू विक्री सुरू;जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे नागरिकांना आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील मौजे हिवरखेड पूर्णा वाळू घाटातील वाळू आता नागरिकांना शासकीय दरात उपलब्ध करून देण्यात आली असून त्यासाठीची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील समस्त नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आवश्यक असलेली वाळू अधिकृतरीत्या प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या १६ फेब्रुवारी २०२४ च्या धोरणानुसार, मौजे टाकरखेड वायाळ येथील गट क्रमांक २७५ मध्ये उभारण्यात आलेल्या वाळू डेपोतून ही विक्री केली जाणार आहे. या वाळूचा दर प्रति ब्रास १२३० रुपये निश्चित करण्यात आला असून, यामध्ये मंजूर निविदा दर ५५३.५० रुपये, ६०० रुपये स्वामित्वधन, ६० रुपये जिल्हा खनिज प्रतिष्ठान () निधी आणि १६.५२ रुपये एसआयई शुल्काचा समावेश आहे. वाळू वाहतुकीचा खर्च मात्र ग्राहकांना स्वतः करावा लागणार आहे. नागरिकांनी वाळू नोंदणीसाठी महाखनिज प्रणालीचा वापर करावा, ज्यासाठी सेतू सुविधा केंद्र, ई-महासेवा केंद्र किंवा ://... या संकेतस्थळावर या पर्यायाची सोय उपलब्ध आहे. ही नोंदणी सुविधा दिनांक ६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेपासून कार्यान्वित होणार आहे. ग्राहकांनी वाळूची मागणी नोंदवल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित ट्रान्सपोर्टरशी संपर्क साधून वाळू नेणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यानंतर शासन जबाबदार राहणार नाही, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हास्तरीय अस्मिता लीग क्रीडा स्पर्धेचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली नेहरु युवा केंद्र( ) व जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तालुका क्रीडा संकुल, चिखली येथे जिल्हास्तरीय अस्मिता लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १३ वर्षाखालील, १३ ते १८ वयोगट व १८ वर्षावरील मुली व महिलांसाठी आयोजित करण्यात आली असून, १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी अस्मिता पोर्टल ://.../ या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी खेलो इंडिया प्रशिक्षक अक्षय गोलांडे (मो.९९७५१०५२२२) तसेच जिल्हा युवा समन्वयक आकाश साळोक (मो. ८३७९८९०१०१) यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुली व महिलांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर व जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# माहिती अधिकार अर्ज संबंधित शाळेकडेच सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा या स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण म्हणून घोषित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आवश्यक माहितीचे अर्ज संबंधित शाळास्तरावरच सादर करावेत, असे आवाहन शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (१) व (२) तसेच कलम १९ नुसार प्रत्येक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरणामध्ये सहाय्यक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. त्यानुसार जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी संबंधित पदनिर्देशन नियुक्त्या केलेल्या आहेत. यामुळे शाळांसंदर्भातील माहिती मागविण्यासाठीचे अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज हे शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद बुलढाणा या कार्यालयाकडे न करता संबंधित शाळेकडेच सादर करावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, अर्जदारास माहिती न मिळाल्यास किंवा प्रथम अपील अर्जावर संबंधित शाळेच्या प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन नियमानुसार आदेश पारित न केल्यास, समाधान न झालेल्या अर्जदारांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांच्याकडे विहित मुदतीत सादर करावे, असेही शिक्षण विभागाने कळविले आहे. नागरिकांनी योग्य प्राधिकरणाकडेच अर्ज सादर करून माहिती अधिकार प्रक्रियेचे पालन करावे, असे आवाहन शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बचत गटांच्या उत्पादनांना वर्षभर विक्रीची संधी मिळावी- प्रतापराव जाधव

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा, दि. ५ (जिमाका) : बचत गटांद्वारे उत्पादित मालांना चांगला भाव मिळण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. बचत गटांच्या वस्तू केवळ महोत्सवापुरत्या मर्यादित न राहता त्या बाराही महिने ग्राहकांसाठी उपलब्ध राहिल्या पाहिजेत. यासाठी आठवडी बाजार, विविध महोत्सव, शिबिरे तसेच बचत गटांसाठी कायमस्वरूपी विक्री केंद्र सुरू करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) व आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. जिल्हा ग्राम विकास यंत्रणा,कृषी विभाग व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विक्री प्रदर्शन, मिनी सरस व पौष्टिक तृणधान्य जिल्हास्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन जिजामाता प्रेक्षागार क्रीडा व व्यापारी संकुल येथे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडूरंग कोल्हे, ङ्कउमेदफ्त्रे जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव आदी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, महिलांमध्ये कौशल्य आणि सुप्त गुण मोठ्या प्रमाणात आहेत; मात्र त्यांना योग्य संधी मिळत नाही. या महोत्सवाच्या निमित्ताने महिलांना आपली कला आणि उत्पादने सादर करण्याची संधी उपलब्ध झाली असून त्या संधीचे सोनं करावे. बचत गटांच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न वाढविण्यावर भर देणे गरजेचे असून बँकांनीही महिलांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सीएलएफ () निधी पूर्वी ६० हजार रुपये इतका मर्यादित होता; मात्र केंद्र सरकारने त्यास वाढ देत तो आता दीड लाख रुपयांपर्यंत मंजूर केला आहे. या वाढीव निधीचा बचत गटांना निश्चितच फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांनी कुटुंबाच्या आर्थिक जबाबदारीत सक्रिय सहभाग घ्यावा. त्यामुळे त्यांना कुटुंबात आणि समाजात मान-सन्मान मिळेल. प्रत्येक महिलांनी पुढे येऊन काम करण्याचे धाडस दाखवावे. ङ्कलखपती दीदीफ इतक्यावर न थांबता ङ्ककरोडपती दीदीफ होण्याचा संकल्प महिलांनी करावा. तसेच महिलांनी जे विकते तेच पिकवावे आणि ज्याची विक्री होईल त्याच उत्पादनावर भर द्यावा, असा सल्ला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिला.

# बुलढाणा जिल्हा कारागृहात जीवन विद्या मिशनची मानसिक सबलीकरण कार्यशाळा

जनसंचलन/बुलढाणा

बंदीजनांच्या मानसिक सबलीकरण व सकारात्मक परिवर्तनासाठी जीवनविद्या मिशनच्या वतीने बुलढाणा जिल्हा कारागृह येथे प्रेरणादायी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी बंदीजनाना मान्यवरांव्दारे मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळा कारागृह व सुधारसेवा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई व पूर्व विभाग नागपूर कारागृह उपमहानिरीक्षक वैभव आगे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक मेघा शंकर बाहेकर उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जीवनविद्या मिशनचे काशिनाथ पवार, निलेश पोपळे, गजानन उमाळ, विजय तराळे आणि संदीप तायडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तुरुंग अधिकारी उमेश नाईक यांनी मान्यवरांचे स्वागत केले. गजानन उमाळे यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. निलेश पोकळे यांनी योग व प्राणायामाचे महत्त्व सांगत बंदीजनांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते काशिनाथ पवार यांनी जीवनविद्या मिशनचे महत्त्वपूर्ण सूत्र ङ्कतूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकारफ्त याचा अर्थ स्पष्ट करत बंदीजनांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, माणसाचे सुख-दुःख नशिबावर अवलंबून नसून ते त्याच्या विचारांवर आणि कृतींवर अवलंबून असते. विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यास नशिबही बदलू शकते, असा आशावादी संदेश त्यांनी दिला. कार्यशाळेमुळे बंदीजनांमध्ये सकारात्मकता निर्माण होऊन त्यांच्या मानसिक सबलीकरण व व्यक्तिमत्व परिवर्तनास चालना मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारागृहाचे सुभेदार दरेसिंग चव्हाण, सतीश भराड, विशाल राजगुरू, सुनील बीबे आदींनी विशेष परिश्रम घेतले. अधीक्षक मेघा बाहेकर यांनी मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माजी विद्यार्थी याचा जिल्हा परिषद शाळेच्या प्रगतीसाठी पुढाकार. आजी विद्यार्थी यांच्या साठी घेतली रोबोटीक कार्यशाळा.

**जनसंचलन/ डोणगाव**

महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजनेचे संचालक उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, आरेगावचे माजी विद्यार्थी आदरणीय सोहम वायाळ यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यार्थ्यांसाठी दि. ५मार्चे रोजी रोबोटिक्स व ड्रोन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते ही कार्यशाळा छत्रपती संभाजीनगर येथील रोबोनिस्ट टेक सोल्यूशन यांच्या माध्यमातून घेण्यात आली. सदर कार्यशाळा ग्रामीण भागातील व माझ्या सारख्या खेड्यातून आलेल्या गावात म्हणजे आरेगाव व मादणी येथे घ्यावी म्हणून सोहम वायाळ यांनी प्रयत्न केले तर या कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शकांनी रोबोटिक्स व ड्रोन तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती देत विविध



प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी उडणारे ड्रोन तसेच सेसर वर सुरू होणारे दिवे व इतर साहित्य याबाबत विद्यार्थी समोर प्रात्यक्षिके सादर करण्यात आली विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत रोबोट्स प्रत्यक्ष हाताळून पाहिले व त्यांची कार्यपद्धती समजून घेतली. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाची ओळख करून देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन नवोपक्रमशीलतेला चालना मिळाली. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक संजय जुमडे व सर्व शिक्षक वृंद हजर होते. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी घेतलेला हा पुढाकार सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.तर मादणी येथे ही मुख्याध्यापक व सर्व शिक्षक तसेच विद्यार्थी यांना मार्गदर्शन करुन प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

# चुकीच्या पाटीवरून महिला वाहकासोबत वाद




**जनसंचलन/ संग्रामपूर**

चुकीची पाटी लावल्याच्या कारणावरून एसटी बसमधील महिला वाहकासोबत वाद घालून अश्लील शिवीगाळ, धक्काबुक्की व धमकी दिल्याची घटना संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल फाटा येथे गुरुवार, ५ मार्च रोजी सकाळी घडली. पोलिस प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. वरवट बकाल येथील रवी सोळंके याने बसची पाटी चुकीची असल्याच्या कारणावरून महिला वाहकास जाब विचारत अश्लील शिवीगाळ केली. याप्रकरणी महिला एसटी वाहक विजया कुरील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामगाव पोलिसांनी रवी सोळंके विरुद्ध गुन्हा दाखल केला







आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८